REGISTERED No. B. 3434





# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख ३० एप्रिल १९४७ | अंक १८




पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं, नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# विविध माहिती

**रशिआ-अफगाणिस्थान करार**—रशिआ आणि अफगाणिस्थान या द्रोन देशांच्या दरम्यान बिनतारी संदेश वाहनासंबधीं एक नवा करार घडवून आणला आहे असें रशिअन वृत्तसंस्थेनें जाहीर केलें आहे.

**ब्रिटन-रशियामधील व्यापार**—१९४६ साली ब्रिटननें रशिआला ९० लाख पौंडांपेक्षां अधिक किंमतीचा माल निर्यात केला. सोव्हिएट रशिआ कडून ब्रिटनमध्यें ५० लाख पौंडाच्या किंमतीचा माल आयात झाला. ब्रिटिश सरकारच्या व्यापारी बोर्डाचे अध्यक्ष मि. स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांनीं हा व्यापार बराच वाढविण्याचा सरकारचा विचार असल्याचें नुकतेंच एका प्रसंगीं बोलून दाखविलें.

**शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची जरूरी**—येत्या दहा वर्षांत हिंदुस्थानच्या औद्योगीकरणासाठी शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ किती व कोणत्या प्रकारचे लागतील याची चौकशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे. हे तज्ज्ञ लोक शिकवून तयार करण्यासाठी उपाययोजना दाखविण्याची जबाबदारी कमिटीवर टाकण्यांत आली आहे.

**मद्रास सरकार आणि कापड गिरण्या**—मद्रास प्रांतांत नवीन कापडाच्या गिरण्या काढण्यांत येऊं नयेत; परंतु मध्यवर्ती सरकारनें मंजूर केलेल्या ३ लाख, ५२ हजार चात्या स्वीकारण्यांत याव्या असा ठराव त्या प्रांताच्या कॉंग्रेस विधिमंडळाच्या पक्षांत मोठ्या बहुमतानें मंजूर करण्यांत आला.

**इराक आपली पौंडी गंगाजळी पुरी वसूल करणार**—इराकचे ब्रिटनकडून ७ कोटी, ३० लाख पौंड येणें आहे. या रकमेंत एका पेन्सचीही सूट देण्यास इराक तयार नाहीं असें इराकच्या फडणिसांनीं जाहीर केलें आहे. या गंगाजळीचा उपयोग शेती, पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण यांच्यासाठी करण्यांत येणार आहे असें समजतें.

**मुंबई म्युनिसिपॅलिटीस सरकारी मदत**—मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनला मुंबई सरकारनें कांहीं आणखी आर्थिक मदत करावी काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सरकारनें सर गुलाम महमद ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. प्रो. सी. एन. वकील व श्री. बापूसाहेब गुप्ते हेही समितीचे सभासद आहेत.

**जाव्हाचा तांदूळ येणार**—जाव्हामधून न कांडलेलें भात हिंदुस्थानांत निर्यात करण्यांत येणार आहे. भात पिकविणाऱ्या भागांतून बंदरांकडे भात वाहून नेण्याला मे महिन्यांत प्रारंभ होणार आहे असें समजतें.

**ब्रिटिश वृत्तपत्रांबाबत चौकशी**—ब्रिटिश वृत्तपत्रांची मालकी व नियंत्रण यासंबंधी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या बादशाही कमिशनची पहिली बैठक ता. ३० एप्रिल रोजीं भरणार आहे. या कमिशनच्या सेक्रेटरी म्हणून मिस् जीन नन या ३० वर्षें वयाच्या स्त्री-पदवीधराची नेमणूक झाली आहे.

**ग्रीस-तुर्कस्थानला मदतीची निकड**—ग्रीसला आणि तुर्कस्थानला देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतीला अमेरिकन कॉंग्रेसनें तातडतोब मान्यता द्यावी, अशा अर्थाची निकडीची तार अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मि. जॉर्ज मार्शल यांनीं मास्कोहून केली होती.

**हैद्राबाद संस्थानांतील विमान तळ**—हिंदुस्थान सरकारनें युद्धकाळांत निझामच्या संस्थानांत ५ विमानतळ बांधले होते. ते आतां निझाम सरकारच्या ताब्यांत देण्यांत आले असून त्याबद्दल हिंदुस्थान सरकारला द्यावयाच्या रकमेबद्दल वाटाघाटी चालू आहेत.

**हिंदुस्थानकडे अमेरिकन व्यापारी मंडळ**—हिंदुस्थानकडे अमेरिकन व्यापारी लोकांचें एक शिष्ट मंडळ धाडण्याला अमेरिकेचे दुय्यम मंत्री मि. क्लेटन यांनीं मान्यता दिली आहे. हें वृत्त हिंदुस्थानांतील अमेरिकेचे वकील मि. ग्रेडी यांनीच जाहीर केलें आहे. हिंदी उद्योगधंद्यांना लागणारें यंत्रसाहित्य पुरविण्यांत अमेरिका महत्त्वाचा वाटा उचलूं शकेल असेंही मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**पंजाबच्या कापड वाटपांत कपात**—पंजाब सरकारनें गिरण्यांच्या कापडाच्या वाटपांत कपात केली आहे. दरडोई दरवर्षी १४ वार कापडाऐवजी आतां ९ च वार कापड मिळणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

**हैद्राबाद संस्थानची रस्त्यांची योजना**—हैद्राबाद संस्थानच्या सरकारनें संस्थानांतील रस्ते वाढविण्यासाठी एक योजना तयार केली आहे. या योजनेला ४४ कोटी रुपये खर्च येणार असून ती २२ वर्षांत पुरी व्हावयाची आहे. याच योजनेंत ४ मोठ्या पुलांचाही समावेश करण्यांत आलेला आहे. या पुलांच्या योगानें हैद्राबादचे मद्रासशी व मध्यप्रांताशी दळणवळण अधिक सुलभ होईल.

**जगांतील टिनचें उत्पादन**—जगांतील टिनच्या उत्पादनांत युद्ध संपल्यानंतर जितकी वाढ होईल असें वाटलें होतें तेवढी झालेली नाहीं. टिनच्या उत्पादनाला लागणारीं यंत्रें भरपूर मिळत नसल्यामुळें वाढ होऊं शकली नाहीं. पण त्याचबरोबर कोळशाची टंचाई आणि मजुरांचे संप हींही त्या टंचाईस कारणें आहेत.

**युरोपांत अमेरिकेची ढवळाढवळ**—इटलींतील एक समाजवादी पुढारी मि. पेट्रो नेन्नी यांनीं, अमेरिकेनें ग्रीसला व तुर्कस्थानला देऊ केलेल्या मदतीस विरोध दर्शविला आहे. प्रे. ट्रूमन यांच्या या धोरणामुळें इटलीला वसाहतीचा दर्जा प्राप्त होण्याचा धोका आहे. युरोपीय जनतेनें आपलें राजकीय व आर्थिक भवितव्य स्वतःच ठरविलें पाहिजे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**ग्रामोन्नतीसाठी जिल्हावार शेतकी शाळा**—मुंबई प्रांतांत ९ ठिकाणीं शेतकी शाळा उघडण्याचें मुंबई सरकारनें योजिलें आहे. मांजरी ( पुणें ), धुळें, पुणतांबें (अहमदनगर ), बोरगाव ( सातारा ), आरभावी ( बेळगांव ), कुमठा ( कानडा ), आनंद ( खेडा ), बोर्डी ( ठाणें ) व दोहद ( पंचमहाल ) हीं तीं ठिकाणें होत. त्यांपैकीं पहिल्या तीन शाळा सरकारी रहातील आणि बाकीच्या खासगी व्यवस्थेखालीं राहून त्यांस सरकारी मदत मिळेल. शिक्षण चालू असतांना विद्यार्थ्यांस जेवण व रहाणें ह्यासाठी खर्च पडणार नाहीं. त्यांना रोज एक तास सूत काढून वरखर्चाचे पैसे मिळवावे लागतील. कापसाचे पेळू व चरखे सरकार पुरवील. मॅट्रिक किंवा सातवी यत्ता पास असलेले उमेदवारच शाळेंत घेतले जातील. निवडक विद्यार्थ्यांस सहकार आणि शेतकऱ्यांसंबंधीं कायदे ह्यांचें शिक्षण दिलें जाईल. एका वर्षाचे अखेर प्रत्येक जिल्ह्यांत अशी एक शाळा स्थापन होऊन त्यांत दरसाल ८०० मुलें दाखल होऊं लागतील अशी अपेक्षा आहे. शाळांतील अभ्यासक्रम २ वर्षांचा आहे.


**RESERVE BANK OF INDIA.**

Central Office

**NOTICE.**

IT is hereby notified that the Share Registers of the Bank will be closed and the registration of transfers suspended from the 6th June, 1947 to the 30th June, 1947, ( both days inclusive ).

C. D. Deshmukh,
Governor.

Bombay, 18th April, 1947.

# अर्थ

बुधवार, ता. ३० एप्रिल, १९४७

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




संस्थापक

प्रा. वा. गो. काळे

## बँकेच्या एका कचेरीनें त्याच बँकेच्या दुसऱ्या कचेरीवर काढलेला ड्राफ्ट

### रूढीस कायद्याचें स्वरूप देण्यासाठीं नि. इं. अॅक्टांत दुरुस्ती

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल हिंदुस्थान सरकारनें आपल्या गॅझिटांत प्रसिद्ध केलें आहे. चेक क्रॉस केल्यामुळें बँकांना अॅक्टाच्या १३१ व्या कलमाखाली जें संरक्षण मिळतें, तेंच संरक्षण क्रॉस केलेल्या ड्राफ्टला मिळावें, हा त्या प्रस्तुत दुरुस्तीचा उद्देश आहे. सन्यासी लिंगम वि. एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अॅन्ड आफ्रिका लि. ह्या दाव्यांत, बँकेच्या एका कचेरीनें त्याच बँकेच्या दुसऱ्या कचेरीवर काढलेल्या बँक ड्राफ्ट-बाबत कलेक्टिंग बँकेवर कोणती जबाबदारी येते, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला होता. ( अर्थ, ता. २४ जुलै १९४६, पहा.) न्यायमूर्ति कोयाजी आपल्या निवाड्यांत म्हणाले, "कायद्याच्या ६ व्या कलमांतील व्याख्येप्रमाणें अशा बँक ड्राफ्टला चेक म्हणतां येत नाहीं, आणि अशा ड्राफ्टची वसुली करणाऱ्या बँकेला १३१ व्या कलमाचा फायदा मिळूं शकत नाहीं. (१) असा ड्राफ्ट काढणारी व ( २ ) ज्याचेवर तो काढला ती, ह्या दोन्ही व्यक्ती म्हणजे एकच बँक असल्यानें ड्राफ्ट काढणारी बँक ज्याचेवर ड्राफ्ट काढला त्याविरुद्ध दावा आणूं शकत नाहीं. अर्थात, ह्या ड्राफ्टला बिल ऑफ एक्सचेंज म्हणतां येणार नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्यें, अशा ड्राफ्टला क्रॉस केलेल्या चेकच्या सवलती मिळाव्यात ह्यासाठी तेथील कायद्यांत मुद्दाम दुरुस्ती करण्यांत आलेली आहे, तशीच हिंदी कायद्यांत करणें आवश्यक आहे." आपण जोपर्यंत निष्काळजीपणा करीत नाहीं तोपर्यंत बँकरच्या ड्राफ्टला बिल ऑफ एक्सचेंजला मिळणाऱ्या सर्व सवलती लागू आहेत, ह्या समजुतीखालीच हिंदी बँकांचे व्यवहार चालत आलेले आहेत. परंतु, त्या रूढीशीं विसंगत असें मत न्या. कोयाजी ह्यांनीं व्यक्त केलेलें आहे. ह्या कारणास्तव, हिंदुस्थान सरकारनें प्रस्तुत रूढीस कायद्याचें स्वरूप देण्यासाठी १३१ वें कलम दुरुस्त करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें, क्रॉस्ड चेक्सबाबत सवलती क्रॉस्ड ड्राफ्टलाहि मिळतील. प्रारंभीं उल्लेख केलेल्या दाव्याचा निवाडा बँकेच्या निष्काळजीपणाच्या प्रश्नावरच देण्यांत आलेला होता; १३१ व्या कलमाच्या आधाराचा प्रश्न त्यांत उपस्थित झाला नव्हता. त्यासी अनुषंगानें न्यायमूर्तींनीं बँक ड्राफ्टबद्दल आपलें मत मात्र वरीलप्रमाणें व्यक्त केलेलें होतें.

### १३१ वें कलम काय सांगतें ?

"एकाद्या बँकरनें सद्सद्विवेकबुद्धीस अनुसरून आणि निष्काळजीपणा न दाखवितां क्रॉस्ड चेकच्या पैशाची वसुली गिऱ्हाइकाचे वतीनें करून दिली व पुढें गिऱ्हाइकाची त्या चेकवर मालकीच नव्हती असें ठरलें, तर चेकच्या खऱ्या मालकास पुन: पैसे देण्याची, बँकरनें पैशाची वसुली केली आहे म्हणून केवळ, त्याचेवर जबाबदारी रहाणार नाहीं" असा १३१ व्या कलमाचा अर्थ आहे.

## औद्योगिक उत्पादनांत घट आणि जीवनावश्यक जिनसांवरील नियंत्रण

दिल्ली येथें ऑ. इं. ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल एम्प्लॉयर्सचें १४ वें अधिवेशन नुकतेंच पार पडलें. या प्रसंगीं अध्यक्ष श्री. साकरलाल बालाभाई यांनीं देशांतील उद्योगधंद्यांकडून होत असलेल्या उत्पादनांत अत्यंत अनिष्ट अशी घट होत असल्याबद्दलचे कांहीं महत्त्वाचे आकडे दिले. लोखंडाचें जास्तींत जास्त उत्पादन २० लाख टनापर्यंत पोचलें होतें तें १४ लाख टनापर्यंत खालीं घसरलें आहे. पोलादाचें उत्पादन सुमारें १० लाख टनावरून ९ लाख टनांच्याहि खालीं गेलें आहे. सिमेंटचें उत्पादन २० लाख टनांवरून १९ लाख टनाच्या खालीं गेलें आहे. साखर १२ लाख टनावरून ९ लाख टनापर्यंत घसरली आहे. कागदाच्या उत्पादनांत २५ टक्के घट झालेली आहे; आणि कापडाचें उत्पादन ४ अब्ज ८० कोटींवरून ४ अब्ज वारापर्यंत उतरलें आहे. सर्व देशभर रोजच्या जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा तुटवडा असतांना अशा प्रकारची घट होणें फारच धोक्याचें आहे. त्यामुळें किंमती उतरवून भरमसाट चलनाला आळा घालण्याचे सर्व प्रयत्न विफल झाल्याशिवाय रहाणार नाहींत. उत्पादन घटत चाललें असतां पगार अगर महागाई भत्ता वाढवून आर्थिक स्थैर्य व प्रगति कधींहि होणार नाहीं हें सत्य अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. हीच वस्तुस्थिति हिंदी मजूर विषयक परिषदेंत मध्यवर्ती सरकारचे मजूर मंत्री श्री. जगजीवनराम यांनीं विशद केली आहे. या परिस्थितीला अनेक कारणें आहेत. तथापि त्या सर्वांचा परिणाम म्हणून देशांतील जनतेचें रहाणीचें मान घसरत चाललें आहे. मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें, संस्थानें, कारखानदार व मजुरांचे प्रतिनिधी या सर्वांनीं मिळून उपाय योजना केली तरच कांहीं मार्ग निघूं शकेल.

मुंबई प्रांताचे मुख्यप्रधान श्री. खेर यांचें इंडिअन मर्चंट्स् चेंबर या व्यापारी संस्थेतर्फे नुकतेंच स्वागत करण्यांत आलें. या प्रसंगीं श्री. खेर यांनीं जीवनावश्यक वस्तूंवरील नियंत्रण नजीकच्या काळांत दूर होण्याचा संभव नाहीं असें सांगितलें. युद्ध संपून दीड वर्षावर काळ लोटला असल्यानें या वस्तूंवरील नियंत्रणें उठवावीं म्हणजे खुल्या व्यापाराला प्रारंभ होऊन या वस्तूंची तूट पडणार नाहीं अशी मागणी व्यापारी वर्गाकडून अलीकडे करण्यांत येऊं लागली आहे. पण वस्तूंवरील नियंत्रणें उठविलीं कीं त्यांच्या किंमती झपाट्यानें वाढतात असा अनुभव सर्व जगभर येत आहे. अन्नधान्याच्या व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनांत मागणीप्रमाणें वाढ झालेली नसल्यानें सामाजिक न्यायाच्या दृष्टीनें निदान अशा वस्तू तरी सर्वांना पुरेशा मिळतील अशी व्यवस्था करण्याचें कोणत्याही आधुनिक सरकारचें कर्तव्यच आहे. यावर कांहीं अर्थशास्त्रज्ञांचें मत असें आहे कीं नियंत्रणें उठल्यावर कांहीं दिवस जरी किंमती वाढल्या तरी व्यापाऱ्यांच्या विक्रयाच्या स्पर्धेमुळें त्या लवकरच योग्य तितक्या प्रमाणांत खालती येतील. ह्या युक्तिवाद दूरवर व

दीर्घ कालाचा विचार केला तर बरोबर आहे; परंतु किंमती खाली येईपर्यंतच्या कालांत भळत्याच किंमती, यामुळे लागून गरीब वर्गाचे हाल होतील त्याची वाट काय? अगोदरच युद्धकालीन पैशाचा सुकाळ ओसरू लागला आहे. त्यांतच जर आवश्यक वस्तूंच्या किंमती दारूच्या बाणाप्रमाणे वर जाऊ लागल्या तर समाजांतील खालच्या थरावर अनवस्था प्रसंग ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां चालू परिस्थितींत नियंत्रणें चालू ठेवणेंच इष्ट आहे, यांत शंका नाहीं. हा टंचाईचा काळ निघून गेल्यावर ह्या वस्तूंचा व्यापार सरकार आपल्या ताब्यांत ठेवू इच्छित नाहीं हेंहि पंतप्रधानांनी आपल्या भाषणांत स्पष्ट केलें आहे. तेव्हां आपल्या व्यापारांत सरकारचा नवा प्रतिस्पर्धी कायमचा उभा रहाण्याची भीति व्यापाऱ्यांस वाटण्याचें कारण नाहीं.

## स्फुट विचार

### अधिक धान्य पिकविण्याची आवश्यकता

युद्धकालीन अन्नधान्याच्या तुटवड्याला तोंड देण्यासाठी तत्कालीन सरकारनें 'अधिक धान्य पिकविण्याची मोहीम' सुरू केली. तीच मोहीम सध्याच्या हंगामी हिंदुस्थान सरकारनें आणखी पांच वर्षें चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हिंदुस्थानांतील आजच्या लोकसंख्येला सुमारे ६ कोटी, ४० लाख टन अन्नधान्याची जरूर आहे. अन्नधान्याच्या वार्षिक उत्पादनाची सरासरी ५ कोटी, ६० लाख टन आहे. त्यांत सुमारे ३० लाख टन डाळीच्या उत्पादनाची भर घातली तरी सुद्धां दर वर्षी ४० ते ५० लाख टन अन्नधान्य कमी पडतें, तेव्हां आजची शिधापद्धति चालू ठेवावयाची असली तरी सुद्धां वरील तुटवडा भरून काढणें अपरिहार्य होऊन बसलेलें आहे. पण हिंदुस्थानची लोकसंख्या दर वर्षी सरासरी ५० लाखांनीं वाढत आहे. तेव्हां अन्नधान्याच्या वाढीच्या कोठल्याही योजनेला वाढती लोकसंख्या विचारांत घ्यावी लागते. अधिक धान्य पिकविण्याची मोहीम हीं अन्नधान्याची टंचाई तात्पुरती दूर करण्याच्या दृष्टीनें आखलेली आहे. या योजनेमुळें सुमारें ३० लाख टन अन्नधान्य अधिक पिकूं लागलें आहे आणि योजना अमलांत आणखी चालू ठेवली तर १९५१–५२ च्या सुमारास हिंदुस्थान अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल असें सरकारला वाटत आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून सरकारनें मोठमोठ्या धरणांच्या योजना तयार केल्या आहेत. सिंधु नदीवरील धरण, ओरिसांतील महा नदी अडविण्याची मोठी योजना, बिहारमधील दामोदर नदीवरील बंधारा, नेपाळमधील कोसी नदीवरील धरण आणि दक्षिण हिंदुस्थानांतील तुंगभद्रा व रामनद सागर योजना, या सर्व दीर्घ कालीन योजना वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षांत घेऊनच आखण्यांत आलेल्या आहेत.

### कै. वा. प्रो. वा. गो. काळे स्मारक–निधी तूर्तची व कायमची योजना

हिंदुस्थानांतील नामवंत अर्थशास्त्रज्ञ कै. वा. प्रो. वा. गो. काळे यांच्या स्मारकाची कल्पना निघून त्यासाठी जमविण्यांत येणाऱ्या निधीची रक्कम हळुहळु वाढत गेली आहे. आतापर्यंत हा निधी ३२ हजार रुपयांच्यावर जमलेला असून आणखीही जमेल अशी अपेक्षा आहे. स्मारक निधीला देणग्या देणाऱ्या सभासदांची सभा ता. २७ जानेवारी १९४७ रोजीं भरून तींत वरील रक्कम तूर्त गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या हवाली करण्याचें ठरलें. संस्थेच्या प्रमुख चालकांकडून सदर रकमेचा स्वीकार केल्याचें पत्रही आलें आहे. महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना होईपर्यंतच्या कालांत स्मारक निधीचा उपयोग करण्यासाठी एक योजना ठरविण्यांत आली आहे. पुढें नियोजित महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाल्यावर हिंदी उद्योगधंद्यांशी संबंधित अशा एखाद्या प्रश्नावर एक व्याख्यानमाला दरवर्षी ठेवण्यांत यावी असें ठरविण्यांत आलेलें आहे. ही व्याख्यानमाला दरवर्षीच्या २७ जानेवारीच्या आसपास ठेवण्यांत यावी म्हणजे कै. प्रो. काळे यांची पुण्यतिथी अनायासेच साजरी होईल असेंहि ठरविण्यांत आलें आहे. तूर्तची योजना अशी आहे:— स्मारक–निधीसाठी जमलेली व जमणारी रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविण्यांत येणार असून त्यावरील व्याजांतून एक संशोधनात्मक शिष्यवृत्ती देण्यांत येणार आहे. शिष्यवृत्तीचें नांव प्रो. वा. गो. काळे संशोधन शिष्यवृत्ती असें राहील. ही शिष्यवृत्ती हिंदी उद्योगधंद्यासंबंधीच्या एखाद्या प्रश्नावर संशोधन करण्यासाठी देण्यांत यावयाची आहे; आणि तिची मुदत २ वर्षें राहणार आहे. ज्या प्राध्यापकाच्या मार्गदर्शकत्वाखालीं संशोधन चालेल त्याला वाटल्यास ही मुदत एक वर्षानें वाढविण्यांत येईल किंवा दोन वर्षांच्या आधींहि शिष्यवृत्ती थांबवितां येईल. संशोधनाच्या अखेर त्यासंबंधीचें पुस्तक गोखले संस्थेनें आपल्या जबाबदारीवर अगर इतर मार्गानें प्रकाशित करावयाचें असून प्रकाशनांत स्मारकनिधींतून चालणाऱ्या शिष्यवृत्तीचा उल्लेख करावयाचा आहे. महाराष्ट्र विद्यापीठाची पुण्यांत स्थापना झाल्यावर स्मारक निधि व्याख्यानमालेसाठी विद्यापीठाच्या हवाली करण्यांत येणार आहे.

### जोग वीज केंद्राची वीज मुंबई प्रांतास परवडणार नाहीं काय?

मुंबई प्रांताच्या दक्षिणेकडील भागास गिरसप्पा नदीवरील जोग वीज पुरवठा योजनेचा कितपत फायदा होऊं शकेल ह्याची सरकारनें चौकशी करविली, तेव्हां सध्यां तेथील उठाव फक्त ४,००० कि. वॅ. असल्याचें आढळलें. जोग केंद्राची वीज घ्यावयाची म्हटलें तर विजेस किती तरी पटीनें मागणी वाढली पाहिजे. बेळगांव-हुबळी-गदग भागांत औद्योगिक प्रगतीस वाव आहे, परंतु तेथें १० वर्षांत १६,००० कि. वॅ. विजेस मागणी आली तरी एका युनिटला ·८७ आणे घेतल्याविना योजना किफायतशीर ठरणार नाहीं. हा विजेचा दर फारच भारी आहे. नियोजित काळी नदी वीज पुरवठा केंद्र ह्या भागास जवळ पडण्याजोगें आहे. शिरशी-सिद्दापूर भागांत मोठ्या कारखानदारीस वाव नाहीं तेव्हां ४० मैलांवरील जोग केंद्राची वीज येथें नेण्यांत अर्थ नाहीं. होनावर, कुमठा आणि गोकर्ण ह्या भागांत थोडे फार कारखाने निघाले तरी तेथील भौगोलिक रचना विजेच्या तारा नेण्यास गैरसोईची आहे. त्यामुळें ·५ आणे दर आकारल्याविना भागणार नाहीं. राणीबेन्नूर-ब्याडगी-हवेरी क्षेत्रास हरिहर सबस्टेशन जवळ पडेल व तेथें १ आणा दर आकारावा लागेल. जोग केंद्राची वीज अधिक स्वस्त दरानें मिळविण्यासाठीं मुंबई सरकार पुनः प्रयत्न करणार आहे आणि त्यासाठी म्हैसूर सरकारशीं वाटाघाटी लवकरच सुरू करील. केवळ वीज आली म्हणून लागलीच नवे कारखाने निघूं शकत नाहींत, ह्यासाठी औद्योगिक वाढीच्या दृष्टीनें तपशीलवार पहाणी करण्यासाठी मुंबई सरकार एका तज्ज्ञाची नेमणूक करणार आहे. इकडे काळी नदी वीज पुरवठा केंद्राच्या पूर्व तयारीचें काम चालू राहीलच.

## सभेच्या अध्यक्षांचें पक्षपाती वर्तन

### डायरेक्टरांची निवडणूक बेकायदा ठरली

युरेशिअन अॅश्युअरन्स कं. लि. ची वार्षिक साधारण सभा २१ सप्टेंबर १९४६ रोजीं भरली होती. त्या वेळीं, डायरेक्टरांचे निवडणुकीचे प्रसंगीं वादी श्री. दलाल व श्री. विजयकर ह्यांच्या वतीच्या २६, ००० मतांच्या प्रॉक्सी अध्यक्ष श्री. राजपाल ह्यांनीं अग्राह्य ठरविल्या व त्यामुळें वादींचे बाजूस १२,८३७ व अतिवादींचें अध्यक्षांचे बाजूस ३०,०३९ मतें पडून वादी डायरेक्टर म्हणून निवडून येऊं शकले नाहींत. १९४१ सालापासून वादी मि. मेयर निसिम ह्यांच्या २६,००० मतांच्या प्रॉक्सी आणील्या आले आहेत व तेव्हांपासूनच्या प्रत्येक सभेचे वेळीं त्या प्रॉक्सी अग्राह्य ठरविण्यांत आल्या आहेत. कंपनीच्या ७५ व्या आर्टिकलनें सभेंतील मतांविषयींचा अध्यक्षांचा निर्णय अखेरचा ठरविलेला आहे.

### प्रॉक्सी रद्द कां ठरविल्या ?

१९४६ च्या वार्षिक सभेनंतर वादींनीं कंपनी, निवडून आलेले दोघे डायरेक्टर व कंपनीचे चेअरमन ह्यांचे विरुद्ध मुंबई हायकोर्टांत दावा आणला व वादी हेच डायरेक्टर म्हणून निवडून आले, अशा हुकुमाची त्यांनीं मागणी केली. अध्यक्षांनीं निष्कारण आणि जाणून बुजून, मुद्दाम प्रॉक्सी रद्द ठरविल्या असें त्यांचें म्हणणें होतें. मि. मेयर निसिम ह्यांचे नांवें शेअर्स असले तरी त्यांनीं कंपनीचें २ लक्ष रु. देणें होतें त्यामुळें त्यांना मताधिकार नव्हता. म्हणून त्यांच्या प्रॉक्सी रद्द करणें युक्त ठरतें असें प्रतिवादींनीं सांगितलें. तथापि २७ मे १९४६ रोजीं मि. निसिम ह्यांचेकडील कंपनीचें येणें वसूल झालें असल्यानें २१ सप्टेंबर १९४६ रोजीं त्यांच्या शेअर्सच्या प्रॉक्सी रद्द कशा ठरविल्या ? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास प्रतिवादी पुढें आले नाहींत. आपल्या स्वतःच्या पक्षाच्या फायद्यासाठीं कंपनीच्या अध्यक्षांनीं प्रॉक्सी सबळ कारण नसतांना रद्द ठरविल्या असें हायकोर्टानें नमूद करून वादींचें म्हणणें ग्राह्य ठरविलें, त्यामुळें निवडून आलेल्या डायरेक्टरांची जागा खाली झाली आणि वादींना ती मिळाली.

**रशियाचें हिंदुस्थानवर लक्ष**—हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता संपुष्टांत येण्याचें चिन्ह दिसूं लागल्यापासून रशिआंतील वृत्तपत्रांत हिंदुस्थानच्या प्रश्नाचा उल्लेख वारंवार येऊं लागला आहे, अशी माहिती एका फ्रेंच वृत्तपत्रानें छापली आहे. या वृत्तपत्रांतून फ्रेंच परराष्ट्रीय कचेरीचे विचार व्यक्त होतात असा समज आहे.

**गव्हाचा नवीन प्रकार**—पाण्याच्या दुष्काळाला अधिक यशस्वी रीतीनें तोंड देणाऱ्या व एकरीं अधिक पीक देणाऱ्या नवीन प्रकारच्या गव्हाची लागवड करण्याचें सोव्हिएट रशिआच्या सरकारनें ठरविलें आहे.

**अणु–शक्तीच्या संशोधनांत अमेरिका मागें पडूं लागली**—तज्ञ, यांत्रिक उपकरणें आणि प्रयत्न या तिन्ही बाबतींत अमेरिका अणु–शक्तीच्या संशोधनांत मागें पडत चालली आहे असा अभिप्राय एका अमेरिकन तज्ञानें व्यक्त केला आहे.

**ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंत विजेचें मोठें केंद्र**—ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंत उद्योगधंद्यांना लागणारी वीज पुरविण्यासाठीं व्हिक्टोरिआ सरोवराचा उपयोग करून घेण्यांत येणार आहे. ही योजना पुरी करण्यासाठीं युगांडांत एक धरण बांधण्यांत येणार आहे. धरण पुरें होण्यास २० वर्षे लागतील अ[illegible] रें झाल्यावर २६ हजार मैल पसरलेल्या या जल[illegible] ी पातळी तीन फुटांनें वाढेल.

## हिंदुस्थान सरकारचें कर्ज

मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री मि. लिआकत अली खान यांनीं सरकारच्या ३१ ऑक्टोबर १९४६ अखेरच्या कर्जासंबंधीची माहिती मध्यवर्ती विधिमंडळांत नुकतीच सांगितली. सरकारच्या कर्जांतील प्रमुख बाबींची एकंदर रकम १९४५–४६ अखेर २९९·२७ कोटी रुपये होते. ३१ मार्च १९३९ अखेर हा आकडा ३६·५९ असा होता. आक्टोबर १९४६ अखेरच्या कर्जाचा तपशील पुढील तक्त्यांत दाखवला आहे.

हिंदुस्थान सरकारचें कर्ज ( आकडे लक्ष रुपयांचे )

| | ३१–३–३९ | ३१ १०-१९४६ |
|---|---|---|
| रुपयांतील कर्ज | | |
| ( अ ) कायम कर्ज | ४,३८,५२ | १५,१६,२६ |
| ( ब ) ट्रेझरी बिल्स | ४६,३० | ७१,१० |
| (क) स्पेशल फ्लोटिंग लोन्स | …… | …… |
| एकूण | ४,८४,८२ | १५,८७,३६ |
| पौंडांतील कर्ज | | |
| (अ) मामुली कर्ज | ३,९६,५१ | १३,३८ |
| (ब) युद्धविषयक मदत | २०,६२ | २०,६२ |
| (क) रेल्वे अॅन्युइटीज | ४७,८२ | २३,३९ |
| एकूण | ४,६४,९५ | ५७,३१ |
| अनफंडेड कर्ज | | |
| हिंदुस्थान | २,२५,१३ | ३,५९,६९ |
| इंग्लंड | ४,१८ | ३,४० |
| | २,२९,३१ | ३,६३,०९ |

## सहकारी सेक्रेटरींचा शिक्षण वर्ग

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या कुलाबा जिल्हा शिक्षण कमेटीच्या नियमानें सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींसाठी शिक्षण–वर्ग पेण येथें ता. ५ मे १९४७ पासून सुरू होणार आहे. हा वर्ग ता. ३१ मे १९४७ पर्यंत चालेल. या वर्गामध्यें सेक्रेटरी म्हणून काम करीत असलेल्या लोकांना आणि नवीन लोकांना शिक्षण देण्यांत येईल. वर्गाची फी रु. ३ व परीक्षेची फी रु. ३ प्रत्येक विद्यार्थ्यास द्यावी लागेल. हा वर्ग पेण येथें इंग्रजी हायस्कूलमध्यें भरेल. पण येथें रहाण्याचा व जेवणाचा खर्च ज्याचा त्यानें करावयाचा आहे. वर्गांतील शिक्षणसमाप्ती नंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यांत येऊन यशस्वी विद्यार्थ्यांना इन्स्टिट्यूटकडून प्रशस्तिपत्रकं देण्यात येतील. हा वर्ग मे महिन्यांत मुद्दाम भरविण्याचें कारण असें कीं या वर्गाचा फायदा मराठी शाळेंतील शिक्षकांनाहि घेतां यावा. तरी सहकाराची आवड असणारांनीं, ज्यांस सहकाराचें शिक्षण आतांपर्यंत घेतां आलें नाहीं त्यांनीं आणि सध्या जे सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी आहेत त्यांनीं या वर्गाचा जरूर फायदा घ्यावा. वर्गांत येऊं इच्छिणाऱ्यांनीं आपले अर्ज खाली सही करणार यांजकडे शक्य तितक्या लौकर पाठवावेत.

सेक्रेटरी,
कुलाबा जिल्हा शिक्षण कमेटी
C/o मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँक, लि.
पनवेल–शाखा.

## हिंदुस्थानांतील होजिअरी धंद्याच्या प्रगतीचा इतिहास

लेखकः— श्री. वसन्तराव किंकर, कोल्हापूर.

जगांतील होजिअरी मालाची बाजार पेठ आपल्या प्रचंड होजिअरी –औद्योगिकतेनें व्यापणारी व्यापारतज्ञ राष्ट्रें आतां नामोहरम झालीं असून होजिअरी धंद्यांतील मोठीं धेंडें बाजूस झाल्यानें होजिअरी धंद्याच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला आहे. आजपावेतों अज्ञान, आळस यामुळें आपण या फायदेशीर व दररोजच्या उपयोगी धंद्याकडे डोळेझांक केली आहे. आतां आपले या धंद्यांतील बडे शत्रू नाहींसे झाले आहेत. तेव्हां जाकरूकतेनें आपल्या या धंद्याचें पुनरुज्जीवन करून राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला मदत केली पाहिजे.

या धंद्याचा इतिहास फार मनोवेधक असून, घरगुती धंदा या दृष्टीनें याला किती महत्त्व आहे याची कल्पना त्यावरून येईल. या धंद्याचें वय आज मितीस ११७ वर्षांचें आहे. १९ वे शतकांत काश्मीरच्या खोऱ्यांतील कारागीर व विशेषतः त्यांच्या स्त्रिया हा धंदा केवळ दुय्यम उदर-भरणाचें साधन म्हणून हाताळत व हातानें केलेलें विणकाम काश्मीरला आलेल्या दिल्लीच्या शोकीन पाहुण्यांस विकीत. पण या गरीब कारागिरांच्यावर दुर्दैव कोसळलें. काश्मीर विभागांत त्यावेळीं भयंकर दुष्काळ पडला व या दुष्काळपीडित लोकांना काश्मीर सोडून पंजाबांत येणें भाग पडलें. विणकामाचा दुय्यम धंदा पुढें त्यांना प्रधान धंदा म्हणून स्वीकारावा लागला.

हातानें व लाकडी मागांवर पायमोजे, मांकडटोप्या, हातमोजे, इत्यादी आवश्यक जिन्नस ते प्रतिदिनीं करीत व त्यांना पुरेसें गिऱ्हाईकही मिळूं लागलें. त्यानंतर ह्या खेड्यापाड्यांतून धंदे करणाऱ्या औद्योगीकांकडे लुधियाना येथील मध्यमवर्गीय लोकांचें लक्ष वेधलें व त्यांनीं त्या धंद्याकडे आपलें मन लावलें. ते लोकर, सूत वगैरे जिन्नस ह्या कारागिरांना पुरवत व कॉंट्रक्ट पद्धतीनें त्यांच्याकडून माल तयार करून फायदा मिळवूं लागले. १८९० पर्यंत अशा तऱ्हेचें पूर्वपुण्य होजिअरी धंद्यानें भोगलें.

या धंद्याच्या आजच्या अवस्थेप्रत पोहचण्यापर्यंतचे तीन विभाग पडतात. एक १८९० पर्यंतचा हस्त व्यवसाय म्हणून. नंतर यांत्रिक व्यवसायाची सुरवात, १९१८ च्या युद्धामुळें आलेली भरभराट व त्यानंतरची मंदीची लाट. पुनश्च १९३३ च्या यांत्रिक सुधारणेनें आलेली उर्जितावस्था.

१८९० नंतर कांहीं धनिकांचें लक्ष या धंद्याकडे गेलें व त्यांनीं लुधिआना येथें यांत्रिक मागाच्या साह्यानें होजिअरी माल तयार करणेचें कार्य सुरु केलें. त्यामुळें विणकरी कारागिरांना दुष्काळापासून संरक्षण मिळालें. पण यांत्रिक प्रगतीला लागणारा माल आपल्या देशांत पैदा न झाल्यानें या धंद्याच्या प्रगतीला परदेशांच्या कृपेची अपेक्षा करावी लागे. पण थोड्याच वर्षांत या धंद्याचें सुदैव उदयास आलें. पहिलें महायुद्ध सुरू झाले आणि होजिअरी मालास भाव आला. देशामध्यें लुधियाना खेरीस इतरत्र या धंद्याची आवड व प्रस्थापना झालेली नव्हती व मालाची सरकारी सैन्यास फारच आवश्यकता होती त्यामुळें या धंद्याकडे त्यावेळच्या सरकारचें थोडेसें लक्ष वेधलें व सरकार या मालास भरपूर किंमत देऊं लागलें. त्यामुळें हा धंदा लुधियानाच्या आसपास प्रत्येक खेड्यांत रूजू तर लागलाच पण मोठ्या मोठ्या फॅक्टरीज् स्थापन झाल्या. पण जितक्या वेगानें या धंद्याचे तारू बाढीस लागलें तितक्याच वेगानें मंदीच्या लाटेनें हा धंदा युद्धोत्तर बसला. कारण सैन्याची मागणी कमी झाली, बेकारी वाढली व जपानच्या आणि जर्मनीच्या सुरेख व स्वस्त मालाशी या आपल्या देशांतील लोकांना टक्कर देतां येईना. कारखानदार अत्यंत हवालदील झाले. त्यानंतर जर्मनींतून येणाऱ्या सुताच्या पुरवठ्यामुळें हा धंदा कसाबसा पूर्वी १९३० पर्यंत जगला. मालक लोक पूर्वी नुसते सुंती व कापडी पायमोजे करीत असत, त्या ऐवजी ते कृत्रिम रेशमी चिजा व स्वेटर्स वगैरे निरनिराळ्या तऱ्हेचे जिन्नस तयार करूं लागले. त्यामुळें व्यापारी चढाओढींत आमचा हा धंदा कसातरी तग धरून राहिला.

मात्र यामुळें एवढें झालें कीं या धंद्याचें मूळ लुधियानांत पक्कें झालें व लुधियाना आज हिंदुस्थानांतील अग्रगण्य असें होजिअरी मालाचें माहेर घर झालें आहे. नुसत्या लुधियानांत १०० होजिअरीच्या गिरण्या असून आसपासच्या खेड्यांतून ... निटिंग माग घरोघरीं दिसून येत आहेत.

अजून होजिअरी हा धंदा आपल्या देशांत संपूर्णपणें स्वयंपूर्ण झालेला नाहीं. या धंद्यास लागणारी मुख्य गोष्ट म्हणजे निटिंगच्या (विणण्याच्या) सुया. पण त्या आपल्या देशांत अजूनही होत नाहींत. हें आपलें दुर्दैव होय. ह्या सुया व सूत ह्या गोष्टी आपल्या देशांत व्हाव्यात, यासाठी सरकारनें व देशांतील व्यापार तज्ञांनीं लक्ष घातलें पाहिजे. या मालास उत्कृष्ट गिऱ्हाईक असून आपले लोक या धंद्याकडे आपुलकीनें कां पहात नाहींत हेंच कळत नाहीं.

त्या धंद्यामध्यें दुसऱ्या युद्धामुळें तर मोठीच क्रांती झाली असून जर वरीलप्रमाणें तज्ञांनीं व धनिकांनीं यांत लक्ष घातलें तर खरोखरच बहार होणार आहे. सबंध मुंबई व अहमदाबाद सोडली तर होजिअरी मालाची एकच मोठी फॅक्टरी पुण्यास पहावयास सांपडते.

महाराष्ट्राला हे चित्र खरोखरच लांछनास्पद नाहीं काय ?


गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा

+ फिनले रु. १५ दि. २५।४।४७

## साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २२।४।४७ | बुधवार २३।४।४७ | गुरुवार २४।४।४७ | शुक्रवार २५।४।४७ | सोमवार २८।४।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४१७-८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २१०५ | २१·५ | २१२२-८ | २१३७-८ | २१९२-८ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९२ | ३९२ | ३९५-८ | ३९५ | ४०५-० |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २६-८ | २६-८ | २६-४ | २६-१२ | २६-८ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३४-९ | ३४-८ | ३४-६ | ३४-१४ | ३४-८ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०७२-८ | १०९० | ११०० | १०८५ | ११२० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९५ | ६०९ | ६१६ | ६२० | ६४३ |
| ९९९; ७६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५७५ | ५८२ | ५८७ | ५९० | ६१३ |
| ५६७; २८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २७८ | २७९ | २७९ | २७९ | २८५ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०४ | ३०५ | ३०८ | २९३+ | ३०५ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २८९ | २९१ | २९३ | २९२ | ३०० |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २९५ | २९८ | ३०५ | ३०६ | ३१५ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-३-६ | ४-४ | ४-४ | ४-४-६ | ४-६ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-२ | १५-७ | १५-८ | १५-८ | १५-१५ |
| ५-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-३ | ३-३ | ३-३ | ३-३ | ३-४ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५७० | ५७३-१२ | ५७५ | ५८० | ५८० |
| २७८; २२५ | ७-८-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७३-८ | १७३ | १७३ | १७३-८ | १७९-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४९ | २५० | २५१ | २५१ | २६३-० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४५६-४ | ४५२-८ | ४५७-८ | ४५५ | ४६५-० |
| ५६०-१० ३६-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१-१० | ३१-१२ | ३१-१४ | ३१-१४ | ३२-६ |

सोमवार दि. २८-४-४७ चे भाव

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १६१ |
| सेंट्रल | १०५ |
| इंडिया | २३२ |
| इंपी० | २२८५ |
| | ५७० |
| रिझर्व्ह | ११८-८ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्र व्हॅली | १५६० |
| बॉम्बे ट्रॅम | ११२ |
| टाटा हायड्रो | १७६ |
| टाटा पॉवर | १६६० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ५३० |
| न्यू इंडिया | ८६ |
| शिवराजपुर | ३७ |
| टाटा केमिकल | १६-१४ |
| टाटा ऑईल | ८३ |
| विमको | २५२-८ |

टाटा डिफर्ड, टा. ऑर्डिनरी आणि डाईंग या शेअरवरील नियंत्रण मंगळवार दि. २९ पासून काढलें आहे.











-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचा उत्तम संच—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें-प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.

## बँका व त्यांचे नोकर ह्यांचे वांध्याचा निवाडा

### कोणत्या बँकांस निवाडा लागू आहे?

—मुंबईमधील ३० बँका व त्यांचेमधील नोकर ह्यांच्रेतील वांध्याचा निवाडा इंडस्ट्रिअल कोर्टानें केला, त्याचा सारांश आम्हीं दिलेलाच आहे. ह्या ३० बँकांत ज्यांचें खेळतें भांडवल १५ कोटी रुपये आहे अशा १२ मोठ्या बँका असून बाकीच्या १८ बँका लहान आहेत. मोठ्या बँकांपैकी एक्सचेंज बँका ४ आहेत. मोठ्या १२ बँकांतील ३,३३९ कारकून व १,२२६ कनिष्ट नोकर वांध्यांत सामील होते. लहान बँकांतील नोकरांचा तत्सम आकडा समजून येत नाहीं. बँक ऑफ महाराष्ट्र लि. हिचे मुंबईतील शाखांवर वांध्याचा निवाडा बंधनकारक आहे. इतर महाराष्ट्रीय बँकांचीं नांवें यादींत आढळत नाहींत.

### कोणत्या नोकरांस फायदा मिळणार?

नोकर वर्गांत कारकून, जमादार, हवालदार, हमाल, भंगी, इत्यादींचा समावेश होतो. सुपरिंटेंडेंट, ज्यूनिअर ऑफिसर, सीनिअर ऑफिसर, इत्यादींस नोकर म्हणता येणार नाहीं. एकाद्या अधिकाऱ्याचे देखरेखीखालीं लिहिण्याचें, हिशेबाचें वगैरे काम करतो तो कारकून; ज्याचें काम केवळ देखरेखीचें किंवा तांत्रिक स्वरूपाचें आहे, तो कारकून नव्हे. ऑफिसर्स ग्रेडला प्रस्तुत वांध्याच्या निवाड्याचा कांहींहि फायदा मिळणार नाहीं. "कोणतीहि बँक नोकरांना ऑफिसर म्हणून त्यांचेकडून कारकुनाचें काम करवून घेणार नाहीं, अशी आमची अपेक्षा आहे. अशी युक्ति बँकेनें योजलीच तर कायद्याप्रमाणें दाद मागण्याचा अधिकार नोकरांस आहेच" असा खुलासा इंडस्ट्रिअल कोर्टानें केला आहे.

### मोठ्या बँका व लहान बँका

बँकांबाबत झालेल्या वेगवेगळ्या कायद्यांनीं बँकांवर अनेक बंधनें व नियंत्रणें घातलीं आहेत, त्यामुळें नव्या व लहान बँकांना काटकसरीची फारच आवश्यकता आहे. त्याखेरीज भक्कम गंगाजळीवाल्या आणि चांगलें व्याज व डिव्हिडंड देणाऱ्या मोठ्या बँकांशीं स्पर्धा करून त्या टिकूं शकणार नाहींत. मोठ्या बँका जास्त खर्च करूं शकतात व त्याचा त्यांच पतीवर किंवा भक्कमपणावर प्रतिकूल परिणाम होण्याजोगा नसतो. ह्यासाठीं, नोकरवर्गाच्या मागणीचा विचार करतांना, सर्व बँकांची वेतन देण्याची शक्ती सारखी आहे, असें मानणें चुकीचें होईल. म्हणून बँकांचे, मोठ्या व लहान बँका असे दोन गट कोर्टानें केले आहेत आणि त्यांच्या शक्तीचे मानानें त्यांचेवर जबाबदाऱ्या टाकल्या आहेत.

---

### ए. बी. सी. बँक

ता. ९ एप्रिल रोजीं न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांनीं वरील बँकेच्या अर्जावरून तिच्या पुनर्घटनेबाबत हुकूम दिला आणि श्री. रायजी ह्यांना मॅनेजर नेमलें. त्यानंतर, बँकेशी संबंध येणारा १५ लक्ष रुपयांचा एक दस्त बनावट असल्याची बातमी लागली तेव्हां श्री. रायजी ह्यांनीं पोलिसाकडे रिपोर्ट केला व डायरेक्टर बोर्डानें तात्पुरत्या लिक्विडेटरच्या नेमणुकीस संमती दिली. ह्या लिक्विडेटरनें श्री. रायजी ह्यांनाच मॅनेजर म्हणून काम पाहूं देण्यास हरकत नाहीं, असा न्या. तेंडोलकरांनीं आतां हुकूम दिला आहे.

### प्रेसिडेन्सी इं. बँक लि.

वरील बँकेचें नांव शेड्यूल्ड बँकांचे यादींत समाविष्ट करण्यांत आलें आहे.



# विजय टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.


# सारस्वत

## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१–१–१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,०४,००० |
| ठेवी | ... | रु. ६८,५९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७५,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर).


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.